Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- XII | DECEMBER | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# कोकणातील लोकसंस्कृतीचे स्वरूप

**नम्रता ढेरे**
संशोधक विद्यार्थिनी, मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महाराष्ट्रातील इतर प्रदेशांपेक्षा कोकणची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. एका बाजूला अथांग अरबी समुद्र पसरलेला आहे, तर दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी कोकणाच्या भूमीला मर्यादित ठेवले आहे. कोकणची भूमी सपाट, समतल नसून डोंगरदऱ्यांनी व्यापलेली आहे. त्यामुळे अशा खडतर परिस्थितीतही कोकणी माणसाचे आनंदाने जगण्याची कला अवगत केली आहे. कोकणातील देव-देवता निसर्गाशी निगडित आहेत. कोकणी माणूस अत्यंत मवाळ व देवभोळ्या स्वभावाचा असल्याने प्रत्येक शुभकार्यात देवाचा कौल घेतला जातो. देवाला विचारून कोणतेही काम केल्याने ते काम निर्विघ्नपणे पार पडते, अशी कोकणी माणसाची भावना आहे. कोकणात सण-उत्सव मोठ्या आनंदाने साजरे होतात. गणपती आणि होळी हे दोन सण इथे मोठ्या प्रमाणात साजरे होतात. कोकणी माणूस देशात कुठेही असू दे; पण या सणांना तो आपल्या गावी येतो, तसेच प्रत्येक गावांचे उत्सव ठरलेले असतात. अनेक गावांमध्ये जत्रा-यात्रा भरतात. अशा सणासुदीच्या वेळी रात्रीच्या प्रहरी कोकणात दशावतार, नमन खेळे, जाखडी, बाल्यानाच अशा लोककला सादर केल्या जातात. गावातील चौकामध्ये या लोककलांचे आयोजन केले जाते. या लोककला फार पूर्वीपासून कोकणात सादर होतात. आजही कोकणामध्ये या लोककला मोठ्या उत्साहाने सादर होतात.

**नमन खेळे :**

कोकणातील प्रामुख्याने रत्नागिरी जिल्ह्यातील अत्यंत लोकप्रिय कलाप्रकार म्हणजे ‘नमन खेळ’ होय. होळीचा सण प्रत्येक देवतांच्या पालख्या बाहेर पडतात व गावातील लोकांच्या घरी मानाप्रमाणे जातात. नमन खेळ्याचे दोन प्रकार आहेत. कलाकार नमन खेळे सादर करण्यासाठी घरोघरी जातात, त्यांना फिरतीचे नमन खेळे म्हणतात, तर जे नमन खेळे उत्सवांच्या निमित्ताने संपूर्ण गावासमोर सादर होतात, त्यांना वस्तीचे नमन खेळे म्हणतात.

नमन खेळे हा लोकनाट्यप्रकार रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे 300 ते 350 वर्षांपासून प्रचलित आहे. हा कलाप्रकार प्रामुख्याने या जिल्ह्यातील कुणबी समाजाने जतन करून ठेवला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात कुणबी समाज मोठ्या प्रमाणात खेड्यापाड्यामध्ये विखुरलेला आहे. या समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असून याव्यतिरिक्त घर बांधणे, विहीर खोदणे इ. कष्टाची कामे करून आलेला थकवा घालविण्यासाठी रात्री मनोरंजनासाठी संतांची अभंगवाणी गात असे. त्यातून स्वतःच्याही रचनांची निर्मिती करीत असे. अशातूनच काही ठरावीक पदन्यास करीत स्वत:सह समाजाचे मनोरंजन करता नमन खेळे प्रकार उदयास आला. यामध्ये विशिष्ट प्रकारची वेशभूषा व वाद्यांचा समावेश झाला. त्यामुळे नमन खेळे आणखीनच आकर्षक झाले.

रत्नागिरी जिल्ह्यात नमन खेळे पाहण्यासाठी आजही लोक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. गावागावात सण-उत्सवाच्या निमित्ताने नमन खेळे सादर केले जातात. या लोकनाट्यकला प्रकारात नाटक आणि नृत्य यांचा मिलाफ साधलेला असतो. या प्रकारातून आराध्य देवतेविषयीची भक्ती आणि अर्चना व्यक्त केली जाते. कोकणामध्ये गणपती आणि होळी हे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या सणाला रत्नागिरीतून बाहेर कोठेही कामानिमित्त गेलेला चाकरमानी घरी येतो. मुंबईत जाऊन मानाची चाकरी करणाऱ्याला चाकरमानी म्हणतात. कित्येक वेळा मालक सुट्टी देत नाही म्हणून नोकरी सोडून या सणासाठी गावी येणारा चाकरमानी पहावयास मिळतो. रत्नागिरीमध्ये होळी हा सण चार ते पाच दिवस साजरा केला जातो. यादरम्यान देवळातले देव पालखीत बसून गावातील प्रत्येक भक्ताच्या घरी जाऊन दर्शन देतात. पालखीचा मान ठरल्याप्रमाणे प्रत्येकाला दिला जातो. त्यानंतर होळी पौर्णिमेला होलिका देवतेसाठी तसेच

ग्रामदेवतेच्या आशीर्वादासाठी फिरतीचे खेळे प्रत्येक घरी जाऊन सादर केले जातात. त्याला फिरतीचे खेळे म्हणतात.

गायन व नृत्यांच्या माध्यमातून फिरतीचे खेळे सादर केले जातात. होळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा त्याच्या दुसऱ्या दिवसापासून गावातील परंपरेने चालत आल्याप्रमाणे प्रत्येकाच्या घरी जाऊन खेळे सादर केले जातात. प्रत्येक घरचा वार आणि तारीख ठरवून घेतली जाते. त्या दिवशी आलेल्या खेळ्यातील कलावंत, वादक यांचा मानसन्मान केला जातो. खेळे सादर झाल्यावर चहा-नाष्टा होतो. त्यानंतर त्या घराचा निरोप घेऊन कलावंत पुढच्या घरी निघून जातात. ज्या घरात खेळे सादर होणार आहेत, त्या घरातील लहान-थोर मंडळी आवर्जुन उपस्थित राहतात. ही परंपरा वंशपरंपरेने चालत आलेली असते.

खेळे गावामध्ये खेळण्यासाठी ग्रामदेवतेची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी गावातील पुजारी किंवा गुरव कौल लावतो व देवाकडून परवानगी घेतो. देवाचा कौल मिळाल्यावर खेळ्याचे कलावंत विविध प्रकारचा पोशाख करून मृदंग व टाळाच्या नादावर गात, नाचत नमने आणि गीते सादर करतात. त्यानंतर ग्रामदेवतेची पालखी बाहेर पडते. पालखीमागून खेळेही बाहेर पडतात. खेळे ग्रामदेवतेचे असल्याने त्यांचे घरोघरी मानाने स्वागत होते. खेळ्यातील कलावंत रामायण व महाभारतातील घटना प्रसंगावर आधारित गीते म्हणतात. या खेळ्यांमध्ये संकासुर, कोळीण अशी सोंगेही विविध प्रकारचा नाच करून खेळ्यात सहभागी होतात. खेळ्याच्या शेवटी आरती म्हटली जाते. त्यानंतर खेळ्यातील कलावंतांचा योग्य तो मानपान केला जातो. यानंतर खेळे त्या कुटुंबाला सुखसमृद्धी लाभण्याचा आशीर्वाद देऊन ते पुढे जातात. गावातील प्रत्येक कुटुंबाला सुखसमृद्धी प्राप्त व्हावी म्हणून फिरतीचे नमन खेळे सदर केले जातात. या खेळ्याशी लोकांच्या धार्मिक भावना जोडलेल्या असतात. होळी सणाच्या निमित्ताने सुरू झालेले फिरतीचे खेळे सादर करण्याची प्रथा निर्माण झाली. तरी गावातील शुभकार्यातसुद्धा नामकरणाच्या निमित्ताने, लग्नविधी, ग्रहप्रवेश इ. शुभकार्याच्या निमित्ताने खेळे खेळले जातात व त्यातून ग्रामदेवतेचा आशीर्वाद मिळविणे व सुख, समृद्धी, आनंद प्राप्त व्हावा, ही भावना दिसते.

नमन खेळ्यामधील दुसरा प्रकार म्हणजे वस्तीचे खेळे होय. गावातील प्रमुख यात्रा, उत्सव, ग्रामदेवतांच्या यात्रेवेळी नमन खेळे प्रकार सादर केला जातो. यातून गावातील प्रत्येकासाठी सुखसमृद्धी मागितली जाते. गावातील सार्वजनिक, धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने ही नमन खेळे हा लोकनाट्यप्रकार सादर करण्याची प्रथा आहे. यामध्ये सत्यनारायणाची महापूजा, रामनवमी, हनुमान जयंती इ.चा समावेश होतो. या प्रकारातून समूहभावना जागृत ठेवली जाते. नमन खेळ्याचे दोन भाग पडतात. एक पूर्वार्ध व दुसरा उत्तरार्ध. पहिल्या भागात रूढी, परंपरेने चालत आलेले प्रस्थापित देव-देवतांचे नमन सादर केले जाते. हे नमन ग्रामदेवतेचे पाच पांडव, सात ऋषी, सात समुद्र, गुरू रावण त्याचबरोबर मायबाप प्रेक्षकांना नमन केले जाते. सर्वसाधारणपणे नमन खेळ्यात सुरुवातीला बारा नमने सादर करण्याची पद्धत आहे. परंतु, काही नमन मंडळे बारापेक्षा अधिक नमने सादर करतात.

*उदा. अहो पहिले नमन, गणपती देवाला ।*
*अहो दुसरे नमन, धरतरी मातेला ।*
*अहो तिसरे नमन, गावीच्या देवाला हो, सांबा हो देवाला ।*
*अहो चौथे नमन, चौथीच्या चांदाला, हो चांद हो सूर्याला ।*
*अहो पाचवे नमन, पाचिवे पांडवाला ।*
*अहो सहावे नमन, गुरू हो स्वामीला ।*
*अहो सातवे नमन, सप्त हो ऋषीला ।*
*अहो आठवे नमन, अष्ट हो भैरवाला, कृष्ण हो देवाला ।*
*अहो नववे नमन, नऊ हो खंडाला ।*
*अहो दहावे नमन, दहा हो रावणाला ।*
*अहो अकरावे नमन, मारूद्र हनुमंता ।*
*अहो बारावे नमन, मंडपी दिव्याला, बैसल्या सभेला ।*

काही नमन खेळे मंडळ वेगळ्या पद्धतीने नमन सादर करतात ते खालीलप्रमाणे :

*उदा. पयलं नमन कोणास बोलू? धरतरी मातेचे चरण धरू।*
*दुसरे नमन कोणास बोलू? गणपती देवाचे चरण धरू।*
*तिसरे नमन कोणास बोलू? तिन्ही तालाचे चरण धरू।*
*पाचवे नमन कोणास बोलू? पाची पांडवांचे चरण धरू।*

अशा पद्धतीने ग्रामदेवता व कुलदेवता नमन सादर करतात. कोकणातील प्रत्येक गावच्या ग्रामदेवता व कुलदेवता वेगळ्या आहेत. त्यामुळे पंचक्रोशीतील देव-देवतांचेही नमन मंडळांची नमन करण्याची पद्धत ही वेगवेगळी असते. हे नमन त्याच्या भागातील बोलीभाषेत

सादर केले जाते. शहरी भागांतून सादर होणारे नमन हे प्रमाणभाषेतून सादर केले जाते.

*उदा. पयलं नमन, धरणी या मातेला।*
*दुसरे नमन, आकाशी मेघाला।*
*तिसरे नमन, तिरलोकी देवाला।*
*चौथे नमन, चौथीच्या चांदाला।*
*पाचवे नमन, पाचही पांडवांना।*

अशाप्रकारे सादर केले जाते. असे नमन सादर झाल्यानंतरच्या भागात खेळे म्हणजे क्रीडा आणि नमन खेळे म्हणजे नाट्यक्रीडा होत. खेळे आरंभी जी बारा नमने गाऊन सादर केली जातात, त्यावेळी ही विशिष्ट प्रकारची नृत्यक्रीडा सादर होत असते. रंगमंचावर मागे पडद्यासमोर खेळे म्हणजेच धारकरी विशिष्ट पदन्यास करीत टाळ वाजवित नमन सादर करतात. यानंतर गणपती पात्र रंगमंचावर येते. त्याचे भक्तिभावाने पूजन केले जाते. गणपतीच्या आशीर्वादानंतर रंगमंचावर संकासूर व कोळीण इत्यादी सोंगे नाट्यपूर्ण प्रसंग सादर करतात. नमन खेळेच्या पूर्वार्धाच्या उत्तरार्धात गवळणीचे मावशीच्या सोबतीने मथुरेच्या बाजारात दूध, दही विकायला जाणे, कृष्णाच्या सांगण्यावरून पेंद्या, सुदामा यांनी वाट अडविणे. त्यानंतर साक्षात कृष्णाने अवतारदर्शन देणे, हे घटनाप्रसंग एकापाठोपाठ एक या पद्धतीने प्रदर्शित होतात. प्रेक्षकांना या प्रसंगांचे विशेष आकर्षण असते. या सर्व प्रसंगांत नाट्य, नृत्य, गायन, वादन यांचा कलापूर्ण व नाट्यपूर्ण मेळ घातलेला असतो. या नाट्यप्रकारात विनोदनिर्मिती करणारे पात्र मावशीचे असते. अख्यान नाट्याच्या अखेरीस वाद्यांच्या संगीतात रावण हे पात्र प्रेक्षकांमधून रंगमंचावर येते. सीतास्वयंवराचा प्रसंग चित्रित होतो. त्यानंतर राम-रावण युद्ध हा प्रसंग आकर्षणाचा विषय असतो. त्यात रावण मारला जातो आणि नाट्य संपते. त्यानंतर ग्रामदेवतेची आरती म्हटली जाते व नाट्य संपते.

**जाखडी नृत्य :**

'जाखडी' या शब्दाचा अर्थ खडी म्हणजे उभ्याने नाच करणे किंवा 'जखडणे' म्हणजे नृत्य करणाऱ्यांनी एकमेकांना श्रृंखला करून जखडून टाकणे. हे नृत्य प्रामुख्याने कोकणातल्या कुणबी समाजाचे आहे. बराचसा कुणबी समाज मुंबईला जाऊन गुलामी गुजराती, पारशी कुटुंबांकडे घरगड्याचे काम करतो. पूर्वी दळणवळणाची साधने अत्यंत कमी होती. त्यामुळे गौरी-गणपतीच्या दिवसांत घरी न जाता त्याच्यासमोर नाच करून हे लोक बिदागी मिळवायचे. या लोकांच्या कानात 'बाळी' नावाचे आभूषण असते. त्यावरून या जाखडी नाचाला 'बाल्यानाच' असेही म्हणतात, तसेच रत्नागिरी जिल्ह्यात कुणबी समाजात मुलांना 'बाला' असेही संबोधतात. यावरून या नृत्याला 'बाल्या डान्स' असेही म्हटले जाते.

रायगड जिल्ह्यात या नृत्याला 'चेऊली नृत्य' असे म्हणतात. कोकणातील यादव, गवळी समाज आणि नृत्याचा जवळचा संबंध आहे. कृष्णा हा गवळी यादव वंशातील होता. कृष्णाच्या निधनानंतर यादवांमध्ये आपापसात भांडणे होऊन यादव राजे मथुरेहून स्थलांतरित होऊन कोकणच्या दिशेने आले व 'चेऊल' या बंदरावर स्थिरावले. आजच्या काळात या लोकांना 'चेऊली गवळी' म्हणून ओळखले जाते. त्यावरून 'चेऊली नृत्य' हे नाव रूढ झाले आणि या नृत्यात श्रीकृष्ण व राधा यांच्यावर आधारलेली गीते गायली जातात. पदन्यासाबरोबर गोफ विणणे ही संकल्पना चिवली नाचामध्ये होती; पण कालांतराने 'चिवली नाच' कमी झाला व शक्तिवाले-तुरेवाले नृत्याने जोर धरला आहे.

रायगड जिल्ह्यात या नृत्यातील 'गणा धाव रे मला पाव रे' या प्रसिद्ध गीतावरून 'धावरे नाच' असेही म्हणतात. रायगडमध्ये 'धाव रे नाच' करणारी मंडळी स्वतःहून गावात येत किंवा गावातील प्रसिद्ध व्यक्ती त्यांना आमंत्रण देत. गणेशोत्सवाच्या दिवसांत कोकणातील लोक शेतीच्या कामातून मोकळे झालेले असतात. त्यामुळे प्रत्येक गावात रायगड जाखडीचा ठेका कानावर पडताच त्या कलावंताबोवती जमून लोक या नृत्याचा आनंद घेतात. या नृत्याला कलगीतुरा किंवा 'शक्तीतुऱ्याचा' सामना असेही म्हटले जाते. याचा उगम शाहिरी काव्य, तमाशा या लोककलेच्या प्रभावाने झाला आहे.

**जाखडी लोककलेचा विकास :**

सहाव्या शतकानंतर होऊन गेलेले कवी नागेश यांनी 'कलगी' या पंचाची सुरुवात केली. त्यांच्या नावावरून या पंथाला नागेशवळी म्हणजेच नागेशाची ओळ अथवा पंथ असेही म्हणतात. त्यानंतर त्यांचा प्रतिस्पर्धी असलेला समकालीन कवी हरदास यांनी तुरेवाले त्या पंथाची सुरुवात केली. त्यांना हरदासवळी किंवा पंथ म्हणतात.

एकाने काव्यातून शिवाचा महिमा सांगितला आहे, तर दुसऱ्याने पार्वतीचा. पुढे या पंथांनी ओळखण्यासाठी चिन्हांचा

वापर केला. कलगीवाल्यांनी कलगी या चिन्हाचा वापर केला, तर तुरेवाल्यांनी डफावर पंचरंगी तुरा लावण्याचा प्रघात पाडला. या कलाप्रकाराचा उगम डफशाहीरीतून झाला व कोकणात ‘जाखडी’ या नावाने तो लोकप्रिय झाला.

**जाखडी नृत्य :**

ढोलकीवर थाप पडताच पहिल्या कलावंताचा प्रवेश होतो. तो दोन वाद्यांवर पाय ठेवून डोक्यावर पेटता दिवा घेऊन सलामी देतो. त्यानंतर जाखडीच्या ठेक्यावर हे कलावत आकर्षक मानवी मनोऱ्याच्या सहाय्याने विविध प्राणी-पक्ष्यांचे आकार घेत कलाविषकार करतात. यामध्ये एक-दोन गायक, एक ढोलकीवादक, एक मृदंगवादक, एक शैलीवादक, एक झांजरीवादक गायकाला साथ देणारे एक-दोन सुरते किंवा कोरस देणारे असतात. ढोलकीवाल्यासोबत एकजण ‘चेंगाटी’ वाजवायला बसतो. ढोलकी उभी ठेवून त्यावर वादकाकडून वाजविण्यात येणाऱ्या प्रकाराला ‘चेंगाटी’ म्हणतात. हे सर्वजण मध्यभागी बसतात.

जाखडी नृत्यामध्ये नर्तकांची संख्या समप्रमाणात असते. 4-6-8 अशा जोड्याने ते सर्वजण त्यांच्याभोवती भरजरी कपडे, पायात चाळ घालून पायांच्या विशिष्ट हालचालींवर नृत्य करतात. प्रथम शक्तिवाले नृत्य सादर करतात. त्यात ईश्वरस्तवन असते. नर्तक नृत्याच्या वेगवेगळ्या चाली सादर करतात. यांच्या चाली जोडचाल, एकपावली, दोनपावली, तीनपावली अशा असतात. या नृत्य करणाऱ्यांना ‘बाल्या’ म्हणतात. उजव्या पायात भरपूर घुंगरू बांधले जातात व नृत्य करताना त्या पायाने ठेका देतात. त्यामुळे इतर वाद्यांबरोबर घुंगरांचाही आवाज होतो. नृत्याची रचना वर्तुळाकार असते. पायातले घुंगरू, गायकाचा उत्साहवर्धक आवाज व ढोलकी, मृदंग, झांज, बाल, बासरी, सनई इत्यादी वाद्यांचे आवाज यामुळे नाच करणाऱ्यांच्या अंगी उत्साह संचारतो व गीतवाद्यांच्या तालावर ते आरोळ्या देतात. या आरोळ्यांमुळे सादरीकरणाला रंग चढतो. या नृत्यामध्ये गण-गौळण, सवाल-जवाबसाठी प्रतिस्पर्धांच्या चुका काढणारे भक्तीपर सामाजिक किंवा सद्यःस्थितीबद्दल माहितीपर गाणी गायली जातात. गणात गणपतीला वंदन केले जाते, तर गौळणीत कृष्णाने गौळणीला केलेला इशारा गायला जातो. सवाल-जवाबात तुरेवाले सवाल विचारतात, तर शक्तिवाले काव्यातून उत्तर देतात.

जाखडी नृत्यामध्ये गोफनृत्याचाही समावेश होतो. या गोफनृत्याचा दक्षिणेकडील ‘पिनल कोलात्त’ आणि गुजरातमधील ‘गोफगुंफन’ यांच्याशी साधर्म्य आढळते. हातात गोफ घेतलेले बाल्या नृत्यासोबत गोफ विणतात व लकबीने सोडवितात. यासाठी रंगीबेरंगी साड्या, ओढण्या व इतर कपडे वापरतात. गाण्यांची रंगत वाढत जाते, तसतसा गोफ घट्ट विणला जातो.

ढोलकीच्या ठेक्यावरती पदन्यास, परस्परांसोबत असलेली सुसुत्रता यांचे फार महत्त्व असते. एका चुकलेल्या पदन्यासानेही गोफ बिघडू शकतो. एका टप्प्यावर गोफ पूर्ण होतो आणि गाण्याची चाल अथवा गाणे बदलले जाते. कडवे झाल्यावर गोफ सोडवितात. बाल्या विरुद्ध दिशेने जाऊन परस्परांना सामोरे जाऊन गोफ सोडवितात.

जाखडीमध्ये विशेषतः राधा-कृष्णावर गीते गायली जातात. कृष्णाच्या रासक्रीडेचाही पौराणिक संदर्भ आहे. बाल्यांचा वेशही कृष्णाप्रमाणे डोक्यावर मुकुट, दंड आणि मनगटावर बाजूबंद असा असतो. गळ्यात माळा असतात. वासुदेवाची गाणी, भारुडातून केलेली लोकजागृती या गीतातून दिसते. तत्कालीन सामाजिक समस्या पौराणिक संदर्भ यांवर शाहीर गीते रचतात. या रचनाकारांचीही घराणी आहेत. त्यांचे नियम व मान हे ठरलेले असतात. फक्त याच घराण्यांना गाणी रचन्याचा मान मिळतो.

जाखडी नृत्याची परंपरा कोकणात तर आहेच, शिवाय मॉरिशसमध्येही ही परंपरा ‘झाकरी नृत्य’ या रूपाने आजही पाळली जाते. 1810 साली ब्रिटिशांनी आधी डच व फ्रेंचांच्या ताब्यातले मॉरिशस घेतले. मॉरिशस म्हणजे उसाचे आगार, त्यामुळे त्यांच्या मशागतीसाठी ब्रिटिशांनी भारतातून मजूर नेले. तमिळनाडू, बिहार, कोकण विशेषतः रायगड, रत्नागिरी इथून काही पैशांच्या आशेने, काही नाईलाजाने तर काही जबरदस्तीने गेले. मात्र, तेथे ते सर्व एकमेकांना धरून राहिले. प्रत्येकाने आपापली संस्कृती जपली. कोकणचे ‘जाखडी नृत्य’ आता ‘जाखरी नृत्य’ बनले आहे. मॉरिशसमध्ये या लोकांची पाचवी पिढी आज उपलब्ध आहे. हे लोक ‘फ्रियाल’ व ‘इंग्रजी’ भाषा बोलतात; पण परंपरेने चालत आलेली गाणी मात्र पक्की म्हणतात. मॉरिशसमध्ये आता ‘जाखरी नृत्य’ हे लोकनृत्य बनले आहे.

या नृत्यामध्ये अलीकडे अनेक बदल झालेले आहेत. पूर्वी या नृत्यात महिला भाग घेत नव्हत्या; पण अलीकडे

जाखरी नृत्याची महिला पथकेही तयार झाली आहेत. या नृत्यात वापरल्या जाणाऱ्या वेशभूषेमध्येही कालांतराने बदल झाला आहे. या नृत्यातील पारंपरिक बालाची गाणी कमी होऊन अलीकडे ध्वनिमुद्रित केलेली गाणी लावली जातात. अलीकडे या नृत्यामध्ये अश्लील भाषा व अश्लील गाणीही म्हटली जातात. परंतु, अलीकडे या नृत्याची परंपरा जपण्यासाठी अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या नृत्यांचे पावित्र्य राखण्यास मदत होते.

यानंतर कोकणातील तिसरी महत्त्वाची लोककला म्हणजे 'दशावतार' होय. 'दशावतार' या लोककलेचे स्वरूप पुढीलप्रमाणे

**दशावतार :**

दशावतार या लोककलेचा उगम रत्नागिरीतील राजापूर तालुक्यातील अडिवरे या गावात झाल्याचा दाखला मिळतो. अडिवरे येथे महाकालीच्या मंदिरामध्ये दशावताराचा पहिला प्रयोग झाल्याची नोंद मिळते. इ.स. 1728 साली 'दशावतार' आणि 'नमन' या लोककलांचा उदय झाल्याचा दाखला मिळतो. आडिवरेतील शामजी नाईककाळे नावाचे गृहस्थ या लोककलांचे उद्गाते असावेत, असा अंदाज बांधला जातो. 'दशावतार'चा उल्लेख समर्थ रामदास स्वामींच्या 'दासबोध'मध्ये आढळतो. त्यामुळे ही कला 17व्या शतकातील असावी असे म्हटले जाते.

*'खेळता नेटके दशावतारी, तेथे येती सुंदर नारी*
*नेत्र मोडिती कलाकुसरी, परि ते अवघे धटिंगण'*

असे 'दशावतार'चे 'दासबोधा'त वर्णन आले आहे. याचा अर्थ 'दशावतार' हा फार पुरातन कलाप्रकार असावा. 'नमन खेळे' व 'जाखडी' या दोन कलाप्रकारांपेक्षा हा कलाप्रकार पूर्णतः वेगळा व स्वतंत्र आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात या कलेचा उत्कर्ष झाल्याचे दिसून येते. सिंधुदुर्गातील मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला या भागात 'दशावतार' विशेष बहरास आला. निव्वळ मनोरंजनासाठी, आनंद प्राप्त करण्यासाठी या कलेचा उगम झाल्याचे म्हटले जाते. कोकणात भात कापणीची कामे झाली की, दहीकाला आणि दशावताराचा हंगाम सुरू होतो. दशावतारी जत्रेचा काळ सहा महिन्यांचा असतो. कार्तिक शुद्ध दशमीपासून (ऑक्टोबर-नोव्हेंबर) ते वैशाख शुद्ध पंचमीपर्यंतचा (एप्रिल-मे) हा काळ होय. रात्री दहा-अकरा वाजता सुरू झालेला 'दशावतार' पहाटेपर्यंत चालत असे.

'दशावतार' शब्दाला पौराणिक संदर्भ आहे. 'दशावतार' म्हणजे विष्णूच्या दहा अवतारांची कथा होय. परंतु, दशावतार म्हणजे केवळ विष्णूच्या अवतारांचे सादरीकरण नव्हे, तर विविधांगी देव-देवतांचा पौराणिक कथांवर आधारित बसविलेले एक प्रकारचे संगीत नाटकच असते. 'दशावतार'च्या सादरीकरणाचे एक दृश्यदशावतार म्हणजे विष्णूने जे दहा अवतार धारण केले ते मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, कलंकी व बुद्ध हे होत. यापैकी पहिली चार रूपे मानवी नाहीत. ती प्राणी रूपे आहेत. नववा अवतार कलंकी व दहावा अवतार बुद्ध हे दोन अवतार दशावतारात दाखविले जात नाहीत. ती प्रत्यक्ष पात्रे मंडपात येत नाहीत. काही पात्रांचा केवळ उल्लेख केला जातो.

'दशावतार'मध्ये पूर्वरंगातील संकासूर, भटजी, गणपती, ऋद्धी, सिद्धी, सरस्वती, ब्रह्मा, विष्णू ही पात्रे आणि उत्तररंगामध्ये रामायण, महाभारत या पुराणांमधील आख्यान असे कार्यक्रमांचे स्वरूप असते. अर्थातच ते नाट्यरूपात सादर होते. रंगभूषेच्या बाबतीत काही ठिकाणी शेरू, काळा कोळसा असे रंग पूर्वी वापरले जात होते. यामध्ये राक्षस पात्रांची रंगभूषा अधिक भडक स्वरूपाची करतात, तर देवांची अत्यंत सात्विक स्वरूपाची करतात.

'दशावतार'मध्ये रंगमंचावर केवळ एक बाकडे, पेटीवाला, तबलेवाला आणि झांजवाला एवढेच वादक असतात. यांच्याच जोरावर हे कलाकार 'दशावतार' सादर करतात. या कलेतील पात्रे स्वतःची वेशभूषा स्वतःच तयार करतात. या कलेमध्ये स्त्री पात्रसुद्धा पुरुषच साकार करतात. हे या कलेचे वेगळेपण आहे. आजच्या युगातली 'दशावतर'मध्ये स्त्री दिसत नाही. या कलेतील पुरुष हा स्त्रीची प्रतिमा अत्यंत हुबेहुबपणे साकारतो, अशी काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

**'दशावतार'चे प्रत्यक्ष सादरीकरण :**

'दशावतार'ला संहिता नसते. जी कथा रंगमंचावर सादर करायची असते ती कथा दिग्दर्शक सर्व कलाकारांना समजावून सांगतो. मग ही सगळी पात्रे अगदी उत्स्फूर्तपणे हे नाटक प्रेक्षकांसमोर सादर करतात. सुरुवातीला गणेश वंदन केले जाते. गणपतीचा प्रवेश होऊन सर्वजण त्यांची आरती करतात. मग गणपती प्रसन्न होऊन सर्वांना आशीर्वाद देतो व परत जातो. त्यानंतर सरस्वतीचे पूजन होते. पूजनानंतर नाटकाचा सूत्रधार रंगमंचावर येऊन कोणते नाटक/कथा

सादर होणार आहे, याची कल्पना प्रेक्षकांना देतो. या कलेमध्ये सूत्रधाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. संपूर्ण नाटकाचे तो इतक्या योग्यपणे संचलन करतो की, कुठेही गडबड होत नाही. मग कथानकानुसार प्रत्येक पात्र रंगमंचावर येते व नाटकाचे कथानक पुढे सरकत जाते. प्रत्येकाने आपले संवाद ठरविलेले असतात. या कलेतील कथा रामायण, महाभारत अशा पुराणातल्या असतात. यावरच आधारित 'दशावतार'चे खेळ हे रात्रभर चालतात. हे या कलेचे मोठे वैशिष्ट्य आहे. हिडिंबा युद्ध, शंकासूर वध, अभिमन्यू वध ही काही खास नाटके लोकांची कायमच आकर्षणे ठरलेली आहेत. कोकणी माणसाला सुखांत आवडतो. त्यामुळे दशावतारी नाटके ही सुखांतिकच असतात.

परंतु, अलीकडे ही नाटके केवळ दोन-अडीच तासच चालतात. आता प्रेक्षकांची मागणी ही थोडक्याच प्रयोगांची असते. मोचेमाडकर, वालावलकर, चेंदवणकर अशी काही प्रख्यात दशावतारी नाटक मंडळी असूनही या मुलुखात आपले बस्तान बसवून आहेत. अनेक महान कलाकरांनी ही कला मनःपूर्वक जोपासली व वृद्धिंगत केली. त्यातले राजाभाऊ आजगावकर, धोंडी मलानकर, गंगाराम मेस्त्री, बाबा पालव अशी अनेक नावे सांगता येतील. बाबी नालंग या कलाकाराला महाराष्ट्र सरकारने दशावतार कलेबद्दल पुरस्कार देऊन गौरविले आहे. आजच्या काळातही मालवणी भागात 'दशावतार'चे खेळ सादर होतात. नवरात्रीपासून दिवाळीपर्यंत अनेक मंदिरात हे खेळ सादर केले जातात.

'दशावतार'मध्ये संगीताची जोड असते. पखवाज, मृदंग, तबला या वाद्यांच्या तालावर या कलेतील गीत सादर होतात. या कलाकारांनी आजही दशावतारातील पारंपरिक संगीत जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक वेळेस शास्त्रीय रागांवर आधारित पद व अभंगरचना अख्यांनाचा वापर हे कलाकार करतात.

अलीकडे आधुनिक तंत्रज्ञान आल्याने या कलेतील पारंपरिकता लोप पावत आहे. आधुनिक लाईटस्, दिवे, माईक इ. उपकरणांचा वापर यांमध्ये अधिक केला जातो.

एकंदरीत कोकणामध्ये प्राचीन काळापासून आलेले नमन खेळे, जाखडी नृत्य, दशावतार या लोककला आजही गावागावांमध्ये सादर केल्या जातात. परंतु, या सर्वच कला आता पारंपरिक राहिल्या नाहीत. समाजासोबत, काळासोबत या कलांनीही बदल स्वीकारला आहे. त्यामुळे कोकणातील या लोककलांच्या सद्यःस्थितीचा विचार करता या कला आता एक स्पर्धा सादर केल्या जातात. नमन खेळे, जाखडी नृत्य सादर करणारी काही पथके तयार झाली आहेत. ही पथके या कला सादर करण्यात तसेच या कोकणी कलेची जोपासणा करणाऱ्यांना सरकारी पाठिंब्याची गरज आहे. सरकारने या कलांना प्रोत्साहन दिले, तर या कलांचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकतो. 'दशावतार'मध्येही आजच्या कालखंडात अनेक ऐतिहासिक नाटके, सामाजिक नाटके सादर केली जातात. अनेक मोठ्या सदरांत नाट्यग्रहांमध्ये या नाटकांचे आयोजन केले जाते. त्यामुळे अनेक हौशी व व्यावसायिक नाटक कंपन्यांची यामध्ये भर पडली आहे.

भविष्यकाळात या लोककला जपण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. या प्राचीन लोककलेतील गीते, कथानके यांचे संकलन करून ते प्रकाशित करावे तसेच या कलांचे संवर्धन करण्यासाठी आर्थिक स्तरावरही मदत होणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. जाखडी नृत्य (बाल्यानाच): लेखक वैजंता गोगावले
2. दशावतार आणि यक्षगान : प्रा. विजयकुमार फातर्पेकर यांचा ब्लॉग
3. लोककला, चर्चासत्र, विकास व सद्यःस्थिती : संपादक शाहीर वि. अ. जगताप.
4. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील लोककलावंताची मुलाखत : रुपेश कळंबटे
5. महाराष्ट्र सारस्वत : वि. ल. भावे
6. मुकुंद काळे (ब्लॉग)